# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

**Email ID – sp.hingoli@mahapolice.gov.in, Contact No.-8669900676**

**Date - 24/ 05/2022**

## अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २३/०५/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ११९ वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन १,१४,८५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

## दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री कर अंतर्गत दिनांक २३/०५/२०२२ रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन गोरेगाव व पोस्टे हट्टा येथे प्रत्येकी ०१ असे एकुण ०२ ठिकणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन एकुण ४,६२०/—रू कि.अं ची अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

## जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. २३/०५/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हिंगोली शहर व पोस्टे कळमनुरी येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू. असा एकुण १०,४९०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

## वाहतुकीस अडथळा करणा—या वाहनावर कार्यवाही :—

हिंगोली जिल्हयामध्ये वाहतुकीस अडथळा करणा—या वाहनावर करणाऱ्याविरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष मोहिम राबविली जात असुन या मोहिमे अंतर्गत दिनांक २३/०३/२०२२ रोजी विविध ठिकाणी एकुण १३ ठिकाणी कार्यवाही करून चालकांविरूध्द २८३ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

## जिल्हा पोलीस दलातर्फे महिला विषयक जनजागृतीपर जननी सुरक्षा कार्यक्रम :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली श्री.एम.राकेश कलासागर यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात पोलीस दलाकडुन महिला व बालकां संबंधि होणारे अन्याय व अत्याचार थांबले पाहिजेत .महिलां व बालकांना त्यांच्या सुरक्षे संबंधि कायदे व नियम यांचे माहिती होवुन त्यांच्यात जनजागृती व्हावी या व्यापक हेतुने जननी हा कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत आहे.